## नोटीस

ताडदेव रोसा मिस्थिका सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पत्ता बी-विंग, रूम नं. २०३/२०४ तुलसीवाडी ताडदेव -४०००३४ या संस्थेचे सभासद असलेल्या वा संस्थेच्या इमारत क्र. बी-२०३/२०४ धारण करणाऱ्या श्रीमती सरोजबेन एन. दोशी यांचे तारीख २२ मे, २०१९ रोजी निधन झाले. वरील नामनिर्देशन केलेली इमारत बी-२०३/२०४ त्यांचे वारस श्री नवीनचंद्र कीर्तिलाल दोशी यांच्या नावावर करण्यात येत आहे आणि सोसायटीचे शेअर सर्टीफिकेट नं. १४/५६ हे सरोजबेन एन. दोशी आणि नवीनचंद्र कीर्तिलाल दोशी यांच्या नावे असलेल्या शेअर सर्टीफिकेट सरोजबेन एन. दोशी मयत झाल्यामुळे पूर्णपणे नवीनचंद्र दोशी यांच्या नावावर होत आहे. तरी कोणाची हरकत असल्यास १५ दिवसांत वरील पत्त्यावर संपर्क साधावा.

# एमपीएससीची मुख्य परीक्षा ४ डिसेंबरला

मुंबई - गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेल्या एमपीएससीच्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२० ची तारीख जाहीर करण्यात आली आहे. यानुसार ४ डिसेंबरला परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. या मुख्य परीक्षेसोबतच महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षेचीही तारीख जाहीर करण्यात आली आहे. अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षेचे आयोजन येत्या १८ डिसेंबर रोजी केले जाईल. मागील अनेक दिवसांपासून विद्यार्थी मुख्य परीक्षेची तारीख जाहीर करावी अशी मागणी करत होते. विद्यार्थ्यांच्या या मागणीची दखल घेत एमपीएससी आयोगाने या परीक्षांबाबत स्वतंत्र परिपत्रक काढलं. तसेच या परिपत्रकाद्वारे राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२० तसेच अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा यांच्या तारखा जाहीर केल्या. या परीक्षा राज्यात एकूण सहा केंद्रावर आयोजित केल्या जाणार आहेत. औरंगाबाद, अमरावती, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे या जिल्ह्यांतील केंद्रावर या परीक्षांचे आयोजन केले जाणार आहे.

## सार्वजनिक सूचना

ॐ औदुंबर प्रसाद को. ऑप. हौ. सोसायटी लि.ची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १९ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता 'ZOOM' माध्यमाव्दारे आयोजित करण्यात आली आहे. तरी केवळ अधिकृत सभासदांनी सभेस 'ZOOM' माध्यमाव्दारे वेळेवर उपस्थित रहावे. गृहनिर्माण संस्थेच्या ज्या सभासदांनी आपला दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक/ email Id या गृहनिर्माण संस्थेकडे नोंदवला नसेल तर त्यांनी हा तपशील ८७७९३८७०३२ या क्रमांकावर Whatsapp व्दारे तात्काळ नोंदवावा.

## जाहीर नोटीस

अस्मिता ज्योती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित रजि क्र. BOM / W- P/HSG (TC) /6691/92/93) चारकोप नाका, मार्वे रोड, मालाड (प.), मुंबई ४०० ०९५. संस्थेतील सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, संस्थेची २८वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २६ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता संस्थेच्या कार्यालयातुन व्हिडिओ कॉन्फरान्सिंगद्वारे आयोजित करण्यात आलेली आहे.

१. दिनांक : २८ वी वार्षिक सर्वसाधारण दिनांक २६.०९.२०२१
२. वेळ : सकाळी १०.०० वाजता
३. माध्यम : अस्मिता ज्योती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित चे कार्यालय
४. भ्रमणध्वनी : ९१३७००४०७७
५. ईमेल आयडी : asmitajyotichsltd@gmail.com

सुचित करण्यात येते की, ज्या सभासदांनी आपला इमेल आयडी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक याबाबतची माहिती ह्या संस्थेकडे नोंद केली नसेल अशा सभासदांनी याबाबतचा तपशिल संस्थेच्या रजिस्टर इमेल आयडी तथा भ्रमणध्वनी क्रमांकावर पाठवावा.

अस्मिता ज्योती सहकारी गृहनिर्माण संस्था
श्री. पुरण शिरसाट
(सचिव)
दिनांक : १२.०९.२०२१

## दि हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह बँक लि.,मुंबई — The Hindusthan Co-Op. Bank Ltd., Mumbai

HEAD OFFICE : HORIZON TOWER, 1ST & 2ND FLOOR, JAI SHASHANK CO-OP. HSG. SOCIETY LTD., OPP. ATI, V.N. PURAV MARG, CHUNABHATTI, MUMBAI - 400 022. • Tel. No.: 022-24052121 / 2424 / 2525 Email : support@hindusthanbank.com • Website : www.hindusthanbank.com

### बँकेच्या सभासदांना सूचना

माहे ३१ मार्च, २०२१ पर्यंत नोंद झालेल्या बँकेच्या सभासदांना सुचीत करण्यात येते की, कोव्हीड-१९ च्या पार्श्वभुमीवर महाराष्ट्र शासन, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग यांनी नागरी सहकारी बँकांना वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्याबाबत वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (सुधारित) अन्वये बँकेची **५१वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक २९/०९/२०२१ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता** बँकेचे मुख्यालय होरायझन टॉवर, १ला व २रा मजला, जय शशांक को-ऑप. हौसिंग सोसायटी, व्ही.एन. पुरव मार्ग, अेटीआय समोर, चुनाभट्टी, मुंबई-४०० ०२२ येथे Video Conferencing (VC) / Other Audio Visual Means (OAVM) द्वारे संपन्न होणार आहे. सदर सभेस सभासदांना VC/OAVM द्वारे सहभागी होण्याकरीता सभासदाचा ईमेल पत्ता (Email ID) व संपर्काकरीता मोबाईल क्रमांक बँकेकडे नोंदविणे आवश्यक आहे. ज्या सभासदांनी यापूर्वी आपला ईमेल पत्ता किंवा संपर्काकरीता मोबाईल क्रमांक बँकेकडे नोंदविलेला नसल्यास खालील नमुन्यात shares@hindusthanbank.com या बँकेच्या E-mail ID, वर मुख्य कार्यालय अथवा नजीकच्या शाखा कार्यालयात दि. २२ सप्टेंबर २०२१ पर्यंत खालील नमुन्यात नोंदविण्याची व्यवस्था करावी.

| सभासदाचे नांव व पत्ता | सभासद क्र. | मोबाईल क्र. | ईमेल आयडी |
|---|---|---|---|
| | | | |

ज्या सभासदांना आपल्या रहिवासाच्या पत्त्यामध्ये बदल करावयाचा आहे त्यांनी नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा.

ठिकाण : मुंबई — सुनील पटवर्धन
दिनांक : १४/०९/२०२१ — सरव्यवस्थापक

## नमुना ग नोटीस
### १९६० व १९६१ नियम १६ (३)

संस्थेचे एकत्रिकरण/त्यांची मालमत्ता व जबाबदाऱ्यांचे हस्तांतरण यामुळे ज्यांच्या हितसंबंधांना बाधा येईल अशा सदस्यांना/धनकोस व इतर इसमास धोक्याची नोटीस बीओएम/आरएसआर (सीआर)/१०२८/सन १९८०/सन १९८०-१९८१ अन्वये नोंदविण्यात आलेली आणि कुर्ला या ठिकाणी जिचे नोंदणी कार्यालय आहे. अशा दि समर्थ को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. कुर्ला संस्थेकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७ पोटकलम (१)च्या परंतुकांची कडीका (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे सर्व सदस्य /धनको हितसंबंध असलेले इसम यांस नोटीस देण्यात येते की, निबंधकाची संमती मिळविल्यानंतर आणि संस्थेच्या दि.२८.०३.२०२१ रोजी भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत तशा अर्थाचा प्रारंभ ठराव मंजुर करण्यात आल्यानंतर संस्थेने शिवराजमुद्रा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित एम/४, गाळा नं. ६, पारिजात को. ऑप. हौ. सोसा. (म्हाडा कॉलनी), सायन कोळीवाडा मुंबई-२२ रजि. नं.बी.ओ. एम./डब्ल्यु.सी./आर.एस. आर./ सी. आर./३७९/ १९९१-९२ या संस्थेचे एकत्रिकरण करण्याचे व सदर संस्थेची मालमत्ता व जबाबदाऱ्या दि समर्थ को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. कुर्ला या संस्थेकडे हस्तांतरीत करण्याचे ठरविले आहे. जिचे एकत्रिकरण, हस्तांतरण करावयाचे त्या संस्थेच्या जबाबदाऱ्या हस्तांतरणासंबंधीचा तपशिल पुढील अनुसूचित दिलेल्या आहेत.

१. संस्थेचे नाव:- दि समर्थ को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. कुर्ला २. संस्थेची मालमत्ता व जबाबदाऱ्या दर्शविणारे पत्रक (सोबत जोडले आहे) ३. सदस्य व धनको यांची नावे (सोबत यादी जोडलेली आहे) ४ . कार्यक्षेत्र:-बृहन्मुंबई

विशेष सुचना: एकत्रिकरण मालमत्ता व जबाबदाऱ्या हस्तांतरण यामुळे ज्या संस्थेवर परिणाम झाला आहे,अशा दोन्ही संस्थांची माहीती स्वतंत्रपणे देण्यात येईल. नियोजित एकत्रिकरण, मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण यामुळे ज्या संस्थेच्या हितसंबंधावर परिणाम झाला आहे अशा कोणत्याही व्यक्तिस या नोटीशीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत संस्थेच्या कार्यालयाकडे आपल्या कोणत्याही हरकती आल्यास त्या पाठविण्याचा आणि नवीन संस्थेचा सदस्य होण्यासंबंधी निवड करण्याचा आपला अधिकार कळविण्याचा, एकत्रिकरण केलेल्या संस्थेतील आपले सदस्यत्व चालू ठेवण्याचा/आपल्या शेअर्सची, हितसंबंधाची किवा येणे असलेल्या रकमेची मागणी करण्याचा अधिकार आहे. ३० दिवसांच्या आत निवड करण्यासंबंधी कोणताही अधिकार चालविण्यात आला नाही आणि कोणतीही हरकत आली नाही, तर हितसंबंधी व्यक्तिची त्या निर्णयास मान्यता आहे, असे समजण्यात येईल.

स्थळ :- मुंबई — अध्यक्ष
दिनांक:- १४ सप्टेंबर, २०२१ — दि समर्थ को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. कुर्ला ४/७,खोत चाल,सर्वेश्वर मंदिर मार्ग, तकिया वार्ड, कुर्ला(प), मुं. ४०००७०

BYP

## कोयनेचे ६ दरवाजे ४ फुटांनी उघडले

सातारा- कोयना धरण पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी सोमवारी सकाळी ११ वाजता धरणाचे सहा वक्र दरवाजे ४ फुटांनी उघडण्यात आले असून ३८ हजार ५३१ क्यूसेक पाण्याचा विसर्ग कोयना नदीपात्रात सुरू आहे. सोमवारी सकाळी ११ वाजता कोयना धरणाची पाणी पातळी २१६२ फूट ११ इंच झाली आणि पाणीसाठा १०४.४९ टीएमसी झाला आहे. पाणलोट क्षेत्रामधील पर्जन्यमानामुळे धरणामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी आज सकाळी ११ वाजता सांडव्यावरून ३६ हजार ५३१ आणि पायथा विद्युत गृहातून २१००, असा एकूण ३८ हजार ५३१ क्यूसेक्स विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे.

## रशियन विमान जपानच्या हद्दीत घुसले

टोकियो- रशियाच्या अँटोनोल एएन-२६ या विमानाने जपानच्या हद्दीत घुसखोरी केली. त्यानंतर जपान हवाई दलाच्या लढाऊ विमानांनी या विमानाला आपल्या देशाच्या हद्दीतून पिटाळून लावले. मात्र जपानच्या हद्दीत घुसखोरी करणारे हे विमान लष्करी नव्हे तर नागरी विमान असल्याचा दावा करण्यात येत आहे. रशियाच्या या विमानाने रविवारी होक्काइडो बेटाजवळ हवाई हद्दीचे उल्लंघन करत कथित दोन वेळेस जपानच्या भागात घुसखोरी केली. याआधी चीनची एक पाणबुडीदेखील जपानच्या सागरी सीमेजवळ गस्त घालताना आढळून आली होती.

## महाराष्ट्र शासन
### सार्वजनिक बांधकाम विभाग, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन, नवी मुंबई.
### निविदा सूचना क्र.१९ सन २०२१-२०२२
### ई-निविदा सूचना

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन,नवी मुंबई ४०० ६१४, (दुरध्वनी क्र.०२२-२७५७१५३४) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑन लाईन) मागवित आहेत.

कामाचे नाव :- १. मौजे भाटी कोळीवाडा येथील अस्तित्वातील जेटटीचे संदीकरण करणे. अंदाजित किंमत :- १,७१,३७,१८८/-

टिप-
१. ई-निविदा किंमत फक्त e-payment gateway व्दारा ऑनलाईन (ना परतावा) स्विकारली जाईल.
२. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील.सदर कामाची ई-निविदा कोणतेही कारण न देता रदद् करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.
३. ई- निविदा उघडल्यापासुन ७५ दिवस ई-निविदा विधिग्राह्य राहील.
४. पत्तन अभियंता यांच्या कार्यालयात सुचना फलकावर सविस्तर ई-निविदा सुचना पहावयास मिळेल.
५. इसारा रक्कम भरण्याबाबतची सुट सा.बां.विभाग, मंत्रालय, शासन निर्णय क्र.सीएटी-०६/२०१४/प्र.क्र.२४२/इमारती-२, दि.२४/०२/२०१६ अन्वये रद्द करण्यात आलेली आहे इसारा रक्कम e-payment gateway व्दारा ऑनलाईन भरणे अनिवार्य आहे.

टिप- ई-निविदेची संपुर्ण माहिती खाली नमुद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच सदर निविदा सुचनेत काहीही बदल /सुधारणा करावयाची असल्यास शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबाबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये खाली नमुद केलेल्या संकेत स्थळावर कळविण्यात येईल.
http://mahatenders.gov.in / https://mahapwd.com

निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी :- दि.१४/०९/२०२१ ते ११/१०/२०२१
निविदा पुर्व बैठक :- दि. ०४/१०/२०२१ दु.१२.०० वा.
निविदा उघडण्याचा कालावधी :- दि. १२/१०/२०२१ दु.०३.०५ वा.

जा.क्र. पअउ/का-२/निविदा/१४५४/२०२१
पत्तन अभियंता यांचे कार्यालय,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन ,नवी मुंबई-४०० ६१४.
दिनांक -
आरओसी-२०२१-२२/क्र-५/सी१९३०

सही/-
पत्तन अभियंता,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन, नवी मुंबईकरिता

## मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. व जि. ठाणे-४०११०१.
दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८१९३०८७.

जा.क्र.मनपा/आस्था /१२५९/२०२१-२२ — दि. ०९/०९/२०२१

### // मुदतवाढ //

संदर्भः- जा.क्र.मनपा/आस्था/११३१/२०२१-२२, दि.१८/०८/२०२१ रोजीची जाहीर सूचना.

मिरा भाईदर महानगरपालिकेतील पाणीपुरवठा विभागासाठी शासनाकडील/महानगरपालिका सेवेतील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधुन सेवा करारपद्धतीने दि. ०८/०९/२०२१ रोजी पर्यंत इच्छुक व पात्र उमेदवारांकडून शाखा अभियंता (स्थापत्य) ०१ व शाखा अभियंता (यांत्रिकी) ०१ या पदासाठी अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

सबब सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधुन शाखा अभियंता (स्थापत्य) व शाखा अभियंता (यांत्रिकी) या पदासाठी अर्ज करणेकरिता दि.०८/०९/२०२१ ते दि. १७/०९/२०२१ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. उर्वरित संदर्भिय जाहीर सुचनेमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सही/-
(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.मनपा/जनसंपर्क/२७४/२०२१-२२
दि. १३/०९/२०२१

## राहूल अर्बन को.ऑप.क्रेडीट सोसायटी लिमीटेड

नोंदणी क्र. : बी.ओ.एम./डब्ल्यु.ई./आर.एस.आर./(सी.आर.)/४३९/१९८९-९०
मुख्यकार्यालय : श्री लक्ष्मी को.ऑप.हौ.सो.लि., ऑफीस नं.२३, १ ला माळा, ना.म. जोशी मार्ग, भायखळा (प), मुंबई ४०००२७ दुरध्वनी - ९००४४९६१०१, ९००४४९६१०८

### : ३१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस :
(फक्त सभासदांसाठी)

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, कोविड-१९, या साथीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासन यांचे दि. ०८/०३/२०२१ रोजीच्या परिपत्रकातील निर्देशानुसार पालन करण्याकरिता **राहूल अर्बन को.ऑप.क्रेडीट सोसायटी लिमीटेड ची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २६ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता** युनिफाईड कोलॅबरेशन सर्व्हिस एलएलपी. ऑफिस नं. १२२०, १२वा मजला, हब टाऊन सोलारीस, एन.एस.फडके मार्ग, पुर्व पश्चिम उड्डाण पुलाजवळ, अंधेरी (पुर्व), मुंबई - ४०००६९ येथे ऑनलाईन पध्दतीने संस्थेचे **अध्यक्ष श्री. बाजीराव शंकर थोरवे** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केलेली आहे. सदर सभा ऑनलाईन पध्दतीने व्हिडीओ कॉन्फरन्स (Video Conference) / (Zoom Cloud Meeting) अदर ऑडीओ व्हिज्युअल मिन्स (Other Audio Visual Means) द्वारे आयोजित केली असल्या कारणाने सभासदांची प्रत्यक्षात उपस्थिती आवश्यक नाही.

: सभेपुढील विषय :
१. दिनांक २८ मार्च २०२१ रोजीच्या ३०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. संचालक मंडळाने सादर केलेला दिनांक ३१ मार्च २०२१ अखेरचा वार्षीक अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक यांना मंजुरी देणे.
३. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२०-२०२१ च्या निव्वळ नफा विभागणीस मंजुरी देणे.
४. सन २०२०-२०२१ चा वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल वाचून स्विकृत करणे.
५. सन २०२१-२०२२ सालाकरिता अंतर्गत व वैधानिक व कर लेखापरिक्षकांची नेमणुक करणे आणि त्यांचा मेहनताना ठरविणे.
६. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण दोषदुरुस्ती अहवाल व त्यावरील शेऱ्यांची नोंद घेवुन कारवाई मंजुर करणे.
७. सन २०२०-२०२१ च्या अंदाज पत्रकातील व प्रत्यक्ष अहवालातील फरकास मंजुरी देणे व नोंद घेणे आणि सन २०२१-२०२२ च्या अंदाज पत्रकास मान्यता देणे.
८. ३१व्या वार्षिक सर्व साधारण सभेस व्हिडीओ कॉन्फरन्स (Video Conference) /अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (Other Audio Visual Means) (Zoom Cloud Meeting) द्वारे गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस क्षमापित करणे.
९. सभासद शिक्षण/प्रशिक्षण अंतर्गत महाराष्ट्र राज्य सहकारी संघा मार्फत मार्गदर्शन.
१०. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या वतीने
श्री. गणेश सहादू शेरकर
सचिव
दिनांक : ११/०९/२०२१
स्थळ : भायखळा, मुंबई

**सर्व सभासदांना कळविण्यात येते की, सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर राहणार असणाऱ्या सभासदांनी त्यांचा अद्ययावत ॲण्ड्राईड मोबाईल नंबर संस्थेच्या मुख्य कार्यालय किंवा जवळच्या शाखेत प्रत्यक्ष किंवा ईमेल द्वारे कळवावा, तसेच सदर मोबाईल वर (Zoom Cloud Meeting) ॲप डाऊनलोड करावी म्हणजे त्यावर आपणांस "मिटींग आयडी" व "मिटींग पासवर्ड" किंवा मिटींग लिंक पाठविण्यात येईल.**

: विशेष सूचना :
१) राहण्याचा किंवा व्यवसायाचा पत्त्यात बदल झाला असेल तर तो संस्थेस लेखी कळवावा. ज्या सभासदांनी नामांकन नोंद केली नसेल किंवा ज्यांना नामांकन बदलवून घ्यायचे असतील त्यांनी बदल करुन घ्यावेत. ज्या सभासदांना ऑडिट रिपोर्ट व दोष दुरुस्ती अहवाल पहावयाचा असेल त्यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयाशी ७ दिवस आधी लेखी स्वरुपात संपर्क साधावा.
२) संस्थेच्या सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल संस्थेच्या संकेतस्थळावर **(www.rahulurban.com)** वर उपलब्ध केलेला आहे. अहवालाची छपाई प्रत दिनांक २०/०९/२०२१ पासून संस्थेच्या शाखांमध्ये व मुख्यालयात उपलब्ध असेल.
३) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा ऑनलाईन पध्दतीने, त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.
४) काही अनपेक्षिक परिस्थितीत उदा. तांत्रिक कारणांमुळे सदर वार्षिक सर्व साधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास, तांत्रिक त्रुटीचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल. याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.
५) ज्या सभासदांना, सभेच्या विषयानुषंगाने काही माहिती हवी असेल किंवा सुचना, प्रश्न सभेपुढे मांडावयाचे असतील तर त्यांनी ते लेखी स्वरुपात दिनांक २०/०९/२०२१ पर्यंत संस्थेच्या कामकाजाच्या वेळेत प्रशासकीय कार्यालयात पोहोचतील अशा रितीने पाठवाव्यात. आयत्या वेळी आलेल्या सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

फॉर्म ए
## जाहीर उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

### रेडियस इस्टेट प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | रेडियस इस्टेट प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | २६ सप्टेंबर,२०१४ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपन्यांचे निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U45201MH2014PTC258381 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | यन बीकेसी, ए विंग, १४०१, प्लॉट क्र. सी-६६, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई वांद्रे उपनगर महा. ५०००५१. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | ६.९.२०२१, मान. एनसीएलटी आदेशाचा दिनांक (आयआरपीद्वारे आदेश प्राप्त झाल्याचा दिनांक १२.९.२०२१) |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | ४.३.२०२२ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | विठ्ठल एम. ठहाके नोंद. क्र. IBBI/IPA-003/IP-N000117/2017-2018/11296 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | ६०३ नीलगिरी अपार्टमेन्ट, आबा करमरकर मार्ग, यशोधाम, गोरेगाव-पूर्व, मुंबई, ४०० ०६३ ईमेल आयडी: vm.dahake@rediffmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता यापरावयाचा पत्ता आणि ईमेल | द्वारा - एमएम जाजू ॲण्ड कं. डी-५०२, नीळकंठ बिझनेस पार्क, विद्या विहार पश्चिम, मुंबई ४०००८६. cirp.reppl@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २७ सप्टेंबर, २०२१ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे विधित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास. | रिअल इस्टेट प्रकल्पाअंतर्गत वाटप |
| १३. | वर्गामध्ये कर्जदाराचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांपैकी नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | १. डॉ. राजेंद्र एम. गणात्रा आयपी नोंद. क्र. IBBI/IPA-003/IP-N00049/2017-2018/10363 २. डॉ. प्रसाद के. धारप आयपी नोंद. क्र. IBBI/IPA-001/IPP00702/2017-2018/11228 ३. डॉ. गणेश वेंकटा सिया रामा क्रिष्णा रेमानी IBBI/IPA-001/IP-P01386/2018-19/12176 |
| १४. | वर्गामधील धनकोंचे प्रतिनिधी (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे) (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल : | येथे लिंक: http://ibbi.gov.in/home/downloads भौतिक पत्ता: भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळ (आयबीबीआय), ७ वा मजला, मल्टूट भवन, शंकर मार्केट, कॅनॉट सर्कस, नवी दिल्ली-११०००१. |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी दिनांक ६.९.२०२१ रोजी रेडियस इस्टेट प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. (दिनांक १२ सप्टेंबर, २०२१ रोजी आदेश वितरित झाला)
रेडियस इस्टेट प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह २७ सप्टेंबर, २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, दलालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय धनकोने, फॉर्म सीएमधील वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी (वर्गाचा उल्लेख करावा) म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती नमूद करावी.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
ठिकाण: मुंबई — विठ्ठल एम. ठहाके
दिनांक: १४ सप्टेंबर, २०२१ — अंतरिम ठराव व्यावसायिक
नोंद. क्र. IBBI/IPA-003/IP-N000117/2017-2018/11296

## दि राजापूर सहकारी बँक लि., मुंबई

: मुख्य कार्यालय :
५६१ सी/बी, आगाखान बिल्डिंग, १ला माळा, डॉ.ई.मोजेस रोड, सातरस्ता, मुंबई- ४०००११

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

बँकेच्या सभासदांची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २९ सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. सदरची सभा ही कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांच्या दिनांक ३० जुलै २०२१ रोजीच्या परिपत्रकातील निर्देशानुसार होईल. **सदर सभा ही व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (VC)/अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (OAVM) द्वारे आयोजित करण्यात आली असल्याने सदर सभेस सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती असणार नाही.** सदर सभेसाठी तन्नम कन्सलटींग, १० वा मजला, परिनी क्रिझेनझो, सी-३०, 'जी' ब्लॉक, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ या संस्थेचे सभागृह हे सभास्थान असेल.

- : सभेपुढील विषय : -
१) दिनांक २७.०३.२०२१ रोजी झालेल्या ४७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२०-२०२१ सालचा संचालक मंडळाचा अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला ३१ मार्च २०२१ अखेरचा ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक तपासनीसांच्या अहवालासह स्विकारणे.
३) सन २०२१-२२ सालासाठी अंतर्गत हिशेब तपासनीसांची केलेल्या नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी देणे.
४) भारतीय रिझर्व्ह बँकेचे दिनांक २७-०४-२०२१ रोजीचे परिपत्रकानुसार सन २०२१-२०२२ या आर्थिक सालासाठी संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार नेमावयाच्या वैधानिक लेखापरिक्षकांबाबतची माहिती घेऊन, त्यास मंजुरी देणे.
५) सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकास कार्योत्तर मंजुरी देणे.
६) वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या रजेला मान्यता देणे.
७) मा.अध्यक्षांच्या अनुमतीने आलेल्या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरून
वसंत सिदाप्पा पाटील
(महाव्यवस्थापक)
दिनांक १४.०९.२०२१

### विशेष सूचना
१. गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच दिवशी ऑनलाईन पद्धतीने सकाळी १०.३० वाजता मूळ विषय पत्रिकेवरील विषयांचा विचार करण्यासाठी सुरू होईल. सदर सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. सभासदांना वार्षिक नफा-तोटा पत्रक, ताळेबंदाबाबत माहिती/प्रश्न विचारावयाचे असल्